## तुम्हांला माहित आहे का?
## भारतीय संविधान बनवण्यात जनतेने सुद्धा सहभाग घेतला आहे.

○ संविधानाची कच्ची प्रत फेब्रुवारी 1948 साली **जनतेसाठी खुली** करण्यात आली. त्याची किंमत होती 1 रुपया. लोकांना सांगण्यात आलं – **"हे आहे तुमचे संविधान. वाचा, विचार करा, आणि तुमच्या सूचना आम्हाला पाठवा."**
आणि काय आश्चर्य! काही आठवड्यांत देशभरातून **7,635 सूचना** आल्या. म्हणजे साडे सात हजारापेक्षा जास्त.

○ या सूचना कुणी दिल्या होत्या? तर गावांतील शेतकरी, कॉलेजमधील प्राध्यापक, वकील, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, महिला संघटना, धार्मिक नेते – म्हणजे **सर्व स्तरांतील लोकांनी** आपला आवाज संविधानापर्यंत पोहोचवला.

○ या सूचनांमध्ये कुणी *मूलभूत हक्कांवर भर दिला*, तर कुणी *स्त्रियांच्या समानतेची मागणी* केली. कुणी *कामगारांचे हक्क* मांडले, तर कुणी *धर्मस्वातंत्र्य* जपावे असा आग्रह धरला.
मग, संविधान बनवणाऱ्या सभेने काय केले? आलेल्या सूचना अशाच सोडून दिल्या का?

○ नाही. तर या सर्व सूचनांचा **मसुदा समिती आणि संविधान सभा सदस्यांनी बारकाईने अभ्यास** केला. त्यातील तब्बल **2473 दुरुस्ती प्रस्तावांवर चर्चा** झाली.
हे काम काही एका दिवसांचं नव्हतं – **महिनोनमहिने या सुचनांवर चर्चा झाली**. काही सूचना मान्य झाल्या, काही सूचना थोडेफार बदल करून सामील केल्या.

**संविधान तयार करण्यात लोकांनीही खूप रस दाखवला.** हे दिसून आले की संविधान सभेच्या चर्चांच्या बैठकीदरम्यान, **पाहुण्यांच्या गॅलरीत एकूण ५३,००० पेक्षा जास्त लोक** आले होते, जे संविधान बनण्याच्या प्रक्रियेकडे उत्सुकतेने पाहत होते.

○ अखेर, अनेक बदल, दुरुस्त्या, आणि चर्चेनंतर संविधान तयार झाले. - ज्याला तयार व्हायला तब्बल 2 वर्ष 11 महीने 17 दिवस लागले.
**म्हणजेच, आपले संविधान हे जनतेच्या सहभागाने साकारलेले आहे, जनतेच्या लोकांच्या आवाजाने घडलेले आहे.**

(आपल्या माहितीसाठी - प्रस्ताव फक्त जनतेच्या सुचनांवर आधारित नव्हते – त्यामध्ये उपसमित्यांचे अहवाल, सदस्यांचे वैयक्तिक प्रस्ताव, आणि अनेक तांत्रिक मुद्दे देखील होते.)

संविधानाच्या लोकांसाठी खुली केलेल्या प्रतीचा फोटो.

